सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

GOVERNEMENT COLLEGE OF ENGINEERING,AURANGABAD

(AN AUTONOMOUS INSTITUTE OF GOVERNMENT OF MAHARASHTRA)

STATION ROAD OSMANPURA AURANGABAD – 431 005

PHONE No. (0240) 2366101 , 2366221 Fax : (0240) 2332835

Email : office.gcoeaurangabad@dtemaharashtra.gov.in website : https://www.geca.ac.in

# 12th Meeting of Finance Committee

## Date : 7th November 2019

## Minutes of Meeting

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद
रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद – ४३१ ००५ (महाराष्ट्र)
*"In Pursuit of Global Competitiveness"*
**☎(0240) 2366101, 2366102, 2366110, 2366111Fax: (0240) 2332835**
**e-mail – principalgeca@yahoo.com** **web : http://www.geca.ac.in**

जा.क्र. शाअमऔ/लेखा/२०१९/3552
दिनांक : 8 NOV 2019

**बाराव्या अर्थ समितीच्या बैठकीचे इतिवृतांत**

दिनांक ७ नोव्हेबर २०१९ रोजी अर्थ समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, सदर बैठकीत समितीसमोर अंदाजपत्रक सादर करण्यात आला होते. सदर बैठकीस खालील पदाधिकारी / अधिकारी उपस्थीत होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री विवेक भोसले, | अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ |
| २. | मा. श्री आर.डी. वैद्य, | सदस्य, व्यवस्थापन मंडळ |
| ३. | डॉ. पी. बी. मुरनाळ | अध्यक्ष, अर्थ समिती |
| ४. | डॉ. यु. जे. कहाळेकर | सदस्य, प्राध्यापक स्थापत्य अभि |
| ५. | श्री आर. आय. कोठारी | निमंत्रीत सदस्य, सनदी लेखापाल |
| ६. | श्री डी. एच. चव्हाण | माहिती समन्वयक अधिकारी |

प्रथम मा. प्राचार्य डॉ पी.बी. मुरनाळ यांनी सर्व मान्यवरांचे व अर्थ समिती सदस्यांचे स्वागत केले व नंतर अर्थ समितीच्या बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**बाब क्रमांक १ व २ : आकराव्या अर्थ समितीच्या इतिवृतांस मंजूरी देणे.**

दिनांक २९.४.२०१९ रोजी संपन्न झालेल्या आकराव्या अर्थ समितीच्या इतिवृता बाबत चर्चा करुन मान्यता (Approval ) दिले. इतिवृत्त कायम करण्यात आले. ११ व्या अर्थसमितीच्या बैठकीचा कार्यवाहीचा अहवाल अर्थ समिती समोर सादर करण्यात आला. केलेल्या कार्यवाही संदर्भात खालील सुचना देण्यात आली.

स्पार्कलेन फॅसीलीटी मॅनेजमेंट प्रा.लि. या एजन्सीकडून टीडीएस रुपये ६५०६६/- भरल्याबाबत पुरावा घेणे :

अर्थ समितीने वरील बाबीवर चर्चाकरुन श्री.आय आर कोठारी, सनदी लेखापाल यांनी सुचना केली की, सदर एजन्सीकडे प्रत्यक्ष कर्मचारी पाठवून संपर्क करावा व त्यांचेकडून २६ ए मिळवावा. जेणेकरुन संस्थेस टीडीएसचा अतिरिक्त भार (As per IT Act प्रमाणे ) पडणार नाही.

संस्थेच्या पीएलए खात्यामधील रक्कम रु १२९५ लक्ष रुपये शासनास वर्ग झाल्याबाबत. :

संस्थेच्या पीएलए खात्यामधील रक्कम रु १२९५ लक्ष रुपये शासनास वर्ग झालेली रक्कम परत प्राप्त करण्यासाठी शासनास पाठपुरावा करण्याचा भाग म्हणून दिनांक ०९ /११/२०१९ रोजी व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीमध्ये ऐनवेळीचा विषय म्हणून सादर करण्यात यावा असे समितीने सुचित केले आहे.

**बाब क्रमांक ३ : आर्थिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम ६ माही (दि.०१/०४/२०१९ ते ३०/०९/२०१९ ) झालेल्या जमा व खर्चास मंजूरी देणे.**

आर्थिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम ६ माही (दि.०१/०४/२०१९ ते ३०/०९/२०१९ ) झालेल्या जमा व खर्चाचे विवरण समितीसमोर सादर करण्यात आले व त्यास मंजूरी देण्यात आली.

अर्थ समितीने संस्थेतील टेक्युप-३ या योजनेचे अंदाजपत्रक स्वतंत्रपणे सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच अपेक्षित जमा होणा-या रक्कमेचा व प्रत्यक्ष जमा रक्कमेचे विवरणपत्र तयार करुन स्वतंत्रपणे अंदाजपत्रक सादर करावे असे सुचित केले आहे.

**बाब क्रमांक ४ : आवर्ती / अनावर्ती अनुदानाचा खर्च कमी झाल्याबाबत**

अर्थ समितीने सन २०१९-२० साठी अनुदानाचे वितरण केले असून दिनांक ०१/०४/२०१९ ते ३०/०९/२०१९ या ६ माही मध्ये आवर्ती /अनावर्ती अनुदानाचा खर्च अत्यंत कमी झाल्याने नाराजी व्यक्त केली. तसेच मंजूर झालेली आवश्यक वस्तू त्वरीत खरेदी करण्यास संबंधीत विभागास सुचना देण्यात यावे असे सांगितले.

**बाब क्रमांक ५ : पुरवणी मागणीस / अंदाजपत्रकास मंजूरी बाबत.**

अर्थ समिती समोर पुरवणी मागणी सादर करण्यात आली त्यामध्ये खालील विभागाच्या अनुदानास मंजूरी देण्यात आली आहे.

| अ.क्र | विभाग | आवर्ती | अनावर्ती | एकूण. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष समन्वयक | ३.२० | ०.०० | ३.२० |
| २ | बांधकाम | ०.०० | १५०.०० | १५०.०० |
| ३ | जिमखाना | २.३६ | ०.०० | २.३६ |
| ०४ | अधिष्ठाता क्यु. ए. | ४.०० | ०.०० | ४.०० |
| ०५ | खाजगी ऐजन्सी मार्फत अतिरिक्त मनुष्यबळासाठी (१६) लागणारी रक्कम | १५.०० | ०.०० | १५.०० |
| ६ | एमसीए | ०.०० | ९.५५ | ९.५५ |
| ७ | हिरक मोहत्सव | १०.०० | ०० | १०.०० |
| ८ | स्मार्ट क्लास रुम व व्हर्च्युअल क्लास रुम तयार करणे (४ स्मार्ट क्लास रुम व १ व्हर्च्युअल क्लास रुम एकूण ५ क्लास रुम ) | ००.०० | १०.०० | १०.०० |
| ९ | इंजिनिअरिंग लॅब एक्सपोलेरेशन लॅब अद्यावत करणे व सर्व शाखेतील विद्यार्थ्यासाठी विविध अंतरराष्ट्रीय विद्यापीठांना भेटी व स्पर्धे साठी तरतूद | ०.०० | ४०.०० | ४०.०० |
| १० | कर्मशाळा विभागासाठी व्हीएमसी मशीन साठी अतिरिक्त निधी | ०.०० | ६.६० | ६.६० |
| | **एकूण** | **३४.५६** | **२१६.१५** | **२५०.७१** |

मा.अध्यक्ष, BAJA SAE Illinois 2019 च्या पुरवणी अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबत प्राप्त प्रस्तावावर चर्चा करतांना नमूद केले की, याबाबीवर होणारा खर्च रा.३८.७१ लक्ष केवळ एकाच विभागाच्या व सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांनाच लाभ होत आहे. सदर बाबीवर होत असलेल्या खर्चाची रक्कम पहाता या रक्कमेचा उपयोग संस्थेतील काही ठराविक विद्यार्थ्यांनाच होणे उचित नाही. म्हणून सर्वशाखेतील विद्यार्थ्यांना लाभ होण्यासाठी सदर निधीची तरतूद सर्वविभगातील विद्यार्थ्यांना करण्यात यावी असे सुचित करण्यात आले .सबब ही पुरवणी मागणी समिती ना मंजूर करण्यात आली आहे. सदर अनुदान हे इतर बाबीवर वर्ग करण्याचे सुचविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पुरवणी मगणीच्या तक्त्यातील अनुक्रमांक ९ वरच्या बाबीवर खर्च करण्यात येणार आहे.

**ऐनवेळचे विषय : वसतिगृहासाठी मंजूर केलेले अनुदान इतर लेखा शिर्षा खाली वर्ग करणेबाबत**

संस्थेतील पदवीत्तर पदवीच्या विद्यार्थीनीच्या वसतिगहासाठी फर्निचर करीता मंजूर केलेले अनुदान वर्ग करुन खुर्ची खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

शेवटी सर्वाचे आभार व्यक्त करुन बैठक संपल्यांचे अध्यक्षांनी सांगितले.

| नांव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १. मा. श्री विवेक भोसले, | अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ | : |
| २. मा. श्री आर.डी. वैद्य, | सदस्य, व्यवस्थापन मंडळ | : |
| ३. डॉ. पी. बी. मुरनाळ | अध्यक्ष, अर्थ समिती | : |
| ४. डॉ. यु. जे. कहाळेकर | सदस्य, प्राध्यापक स्थापत्य अभि | : |
| ५. श्री आर. आय. कोठारी | निमंत्रीत सदस्य, सनदी लेखापाल | : |
| ६. श्री डी. एच. चव्हाण | माहिती समन्वयक अधिकारी | : |

डॉ पी.बी.मुरनाळ,
प्राचार्य तथा अध्यक्ष अर्थ समिती
शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय,औरंगाबाद

प्रत सर्व पदाधिकारी / अधिकारी यांना माहितीस्तव .